# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ

**"ज्ञानतीर्थ", विष्णुपुरी , नांदेड - ४३१ ६०६ (महाराष्ट्र)**

दुरध्वनी :(०२४६२) २२९२९४,फॅक्स :२२९५२०,इमेल srtmuncoe@gmail.com


जा.क्र. पनिका/आढावा समिती/२०१४-१५/ दिनांक : ०५/०१/२०१५

प्रति,
**मा. प्राचार्य**
सर्व संलग्नीत महाविद्यालये
प्रस्तुत विद्यापीठ.

विषय : **नियत वयोमानाने सेवानिवृत्त होणा-या प्राध्यापकांच्या प्रस्तावाबाबत.**

संदर्भ :शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. संकीर्ण- २०११/(३९६/११)/विशी-१,दि.२३/११/२०११.

महोदय

उपरोक्त विषय व संदर्भीय शासननिर्णयानुसार आपणास कळविण्यात येते की ,प्रस्तुत विद्यापीठातील संलग्नीत महाविद्यालयातील नियत वयोमानाने सेवानिवृत्त झालेल्या/होणा-या अध्यापकांच्या सेवेत ६० वरुन ६२ वर्ष सेवेत वाढ करण्यासंबधी सादर करण्यात येणा-या प्रस्तावासंदर्भात महाविद्यालयाने खालील सूचनेप्रमाणे प्रस्ताव तपासुन आढावा समितीकडे महाविद्यालयाच्या पत्रासह प्रस्ताव दाखल करण्यात यावेत.

१. सेवानिवृत्त होणा-या प्राध्यापकांच्या सेवानिवृत्त दिनांकाच्या किमान ०३ महिन्यापुर्वी प्रस्ताव आढावा समितीस दाखल करण्यात यावेत.
२. अद्यापकाने केलेल्या शैक्षणिक कामकाजाबाबतचा प्रस्ताव एकुण ०६ प्रतीत पाठवावा.
३. अध्यापकांचे मेडीकल फिटनेस सर्टीफिकेटस हे शासकीय वैद्यकीय मंडळाकडुन निर्गमीत केल्याची एक मुळप्रत व उर्वरित सत्यप्रती साक्षांकीत करुन प्रस्तावास जोडणे आवश्यक आहे.
४. प्रस्तावास जोडलेल्या सर्व कागदपत्रांच्या साक्षांकीत प्रती करण्यात याव्यात.
५. पीएच.डी प्रमाणपत्र व Notification ची सत्यप्रत प्रस्तावास जोडावी.
६. पाच वर्षाचे स्वतंत्ररित्या गोपनिय अहवाल हे वर्षनिहाय विहित नमुन्यात भरुन प्रतिवेदन व पुर्नविलोकन करुन प्रस्तावास जोडावे.
७. संबंधीत अध्यापकाने जोडलेली सर्व कागदपत्रे ही बरोबर आहेत. व सदर कागदपत्रामध्ये काही तफावत निदर्शनास आल्यास संबंधीत अध्यापक हे स्वत: जबाबदार राहतील अशा आशयाचे प्रतिज्ञापत्र संबंधीत प्राध्यापकाकडुन घेवुन प्रस्तावासह जोडण्यात यावे.

उपरोक्त सूचनेबाबत महाविद्यालयाने योग्य ती तपासणी करुनच प्रस्ताव ०६ प्रतीमध्ये **दि. २० जानेवारी २०१५** पर्यंत परीक्षा विभागास पाठवावेत.कळावे,

आपला विश्वासु

स्वाक्षरी /-
**प्र- परीक्षा नियंत्रक तथा सदस्य सचिव**
आढावा समिती, प्रस्तुत विद्यापीठ.